दिनुशाच्या झुंजीनंतरही भारताचा वरचष्मा

श्रीलंका 'फॉलोऑन'च्या छायेत; प्रसिध, सुथारचा प्रभावी मारा

वृत्तसंस्था, कोलंबो

संक्षिप्त धावफलक

- **भारत (पहिला डाव) :** ९ बाद ५०३ घोषित
- **श्रीलंका (पहिला डाव) :** ८३.४ षटकांत ८ बाद २६५ (सोनल दिनुशा नाबाद ८५, पासिंदू सूरियाबंडारा ८०, कामिंदू मेंडिस ३२; प्रसिध कृष्णा ३/४७, मानव सुथार ३/८३, मोहम्मद सिराज १/३३, रवींद्र जडेजा १/४५)

श्रीलंकेचा नवोदित फलंदाज सोनल दिनुशाने (१३७ चेंडूंत नाबाद ८५) पुन्हा एकदा भारतीय गोलंदाजांपुढे अडथळा निर्माण केला. तसेच पासिंदू सूरियाबंडारा (१३३ चेंडूंत ८०) यानेही झुंज दिली. मात्र, आघाडीच्या आणि मधल्या फळीतील अन्य फलंदाजांच्या अपयशामुळे दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात यजमान श्रीलंकेचा संघ 'फॉलोऑन'च्या छायेत आहे. उंचपुरा वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णा (३/४७) आणि डावखुरा फिरकीपटू मानव सुथार (३/८३) यांच्या प्रभावी माऱ्यामुळे भारतीय संघाने सामन्यावरील पकड कायम राखली आहे.

कोलंबो येथे सुरू असलेल्या सामन्यात भारताच्या पहिल्या डावातील ५०३ धावांच्या प्रत्युत्तरात श्रीलंकेने तिसऱ्या दिवशी २ बाद ८ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केली. दिवसभराच्या खेळात श्रीलंकेने ठरावीक अंतराने गडी गमावणे सुरूच ठेवले. पाऊस आणि नंतर अंधुक प्रकाशामुळे दिवसाचा खेळ लवकर थांबवावा लागला, तेव्हा श्रीलंकेची ८ बाद २६५ अशी स्थिती होती. श्रीलंकेला 'फॉलोऑन' टाळण्यासाठी आणखी ३८ धावांची आवश्यकता आहे. तसेच भारताच्या पहिल्या डावाच्या धावांहून श्रीलंका अजूनही २३८ धावांनी पिछाडीवर आहे.

सूरियाबंडारा आणि कामिंदू मेंडिस यांच्यात चौथ्या गड्यासाठी ८७ धावांची, तर दिनुशा आणि केशरा नुवांथा यांच्यात आठव्या गड्यासाठी ५७ धावांची भागीदारी झाली. मात्र, याव्यतिरिक्त श्रीलंकेला मोठ्या भागीदाऱ्या रचता आल्या नाहीत. याचाच त्यांना फटका बसला.

तिसऱ्या दिवशी प्रसिध कृष्णाने वेग आणि उसळीचा उत्तम वापर करत श्रीलंकेच्या फलंदाजांना सातत्याने अडचणीत आणले. दिवसाच्या सुरुवातीलाच त्याने उसळी घेणाऱ्या चेंडूवर कामिल मिशाराला (१९) बाद केले. यानंतर केवळ आपला दुसराच कसोटी सामना खेळणाऱ्या श्रीलंकेच्या सूरियाबंडाराने संयम आणि आक्रमकता यांचा योग्य मेळ साधला. त्याने ७६ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. त्याच्यासह कामिंदू मेंडिसनेही भारताच्या फिरकी गोलंदाजांचा चांगला सामना केला. मेंडिसने मानव सुथारच्या गोलंदाजीवर षटकार ठोकून आक्रमक मनसूबे स्पष्ट केले. मात्र, प्रसिध कृष्णाने पुन्हा एकदा वेगवान आणि उसळी घेणारा चेंडू टाकून ही भागीदारी फोडली. मेंडिसने फटका मारला, पण चेंडू थेट रवींद्र जडेजाच्या हातात गेला. यानंतर भारताने सामन्यावरील पकड पुन्हा मजबूत केली.

श्रीलंकेचा कर्णधार धनंजय डी सिल्वा (८) याला मानव सुथारने माघारी धाडले, तर खेळपट्टीवर स्थिरावलेल्या सूरियाबंडाराने रवींद्र जडेजाच्या चेंडूवर अनावश्यक फटका खेळत यष्टी गमावली. निरोशन डिकवेला (०) केवळ तीन चेंडूंचा सामना करून मोहम्मद सिराजच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यावेळी श्रीलंकेची ७ बाद २१६ अशी स्थिती होती.

यानंतर दिनुशा आणि नुवांथा जोडीने भारतीय गोलंदाजांसमोर आव्हान उभे केले. त्यांनी १३७ चेंडू खेळून काढत आठव्या गड्यासाठी ५७ धावांची भागीदारी रचली. नुवांथाने तब्बल ७४ चेंडूंचा सामना करत १८ धावा केल्या. अखेर त्याचा संयम सुटला आणि मानव सुथारच्या गोलंदाजीवर आक्रमक फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद झाला. त्यानंतर दिनुशाने लाहिरू कुमारासह नवव्या गड्यासाठी ९२ चेंडूंत ३५ धावांची अभेद्य भागीदारी उभारली आहे. कुमाराने ५० चेंडूंचा सामना करत ६५ मिनिटे क्रीजवर तग धरला.

पहिल्या कसोटीत शतक आणि अर्धशतक करणाऱ्या दिनुशाने पुन्हा एकदा शानदार फलंदाजी केली. त्याने सहा चौकार, दोन षटकारांसह नाबाद ८५ धावा केल्या असून, आता 'फॉलोऑन' टाळण्यासाठी श्रीलंकेची त्याच्यावरच भिस्त आहे.

विश्वचषक हॉकी स्पर्धेतील अपयशाची जबाबदारी कोणाची?

माजी गोलरक्षक श्रीजेशचा संतप्त सवाल

नवी दिल्ली : विश्वचषक हॉकी स्पर्धेतील भारतीय पुरुष आणि महिला संघांच्या निराशाजनक कामगिरीनंतर माजी गोलरक्षक पी. आर. श्रीजेश याने तीव्र संताप व्यक्त केला असून, या अपयशाची जबाबदारी कोणाची, असा प्रश्नही उपस्थित केला आहे. विश्वचषकाकडे अन्य एखाद्या स्पर्धेची रंगीत तालिम म्हणून पाहणे आधी बंद झाले पाहिजे, असे श्रीजेश म्हणाला.

नेदरलँड्स आणि बेल्जियम येथे सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेत भारताच्या दोन्ही संघांचे आव्हान दुसऱ्या फेरीत संपुष्टात आले. या सुमार कामगिरीबाबत आता कोणीतरी प्रश्न विचारण्याची गरज असल्याचे श्रीजेशने म्हटले आहे.

''आपण केवळ चांगली हॉकी खेळणारा संघ तयार करत आहोत, की जगातील सर्वोत्तम संघांविरुद्ध जिंकण्याची क्षमता असलेला संघ तयार करत आहोत? 'खूप काही शिकवणारा अनुभव, चांगली हॉकी आणि आगामी स्पर्धा' यांसारख्या शब्दांमागे लपण्याचे दिवस संपले.



विश्वचषक म्हणजे अन्य एखाद्या स्पर्धेची रंगीत तालिम नाही. विश्वचषकाला योग्य ते महत्त्व, योग्य तो मान दिलाच पाहिजे. तसे होत नसेल, तर कठीण प्रश्न कोण विचारणार? जबाबदारीची मागणी कोण करणार?'' असे प्रश्न श्रीजेशने 'एक्स'वरून उपस्थित केले.

पुढील महिन्यात जपानमध्ये आशियाई क्रीडा स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेचे कारण देऊन विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही, असे श्रीजेशने स्पष्ट केले. ''आशियाई क्रीडा स्पर्धा येत आहेत. तिथे पदक जिंका आणि मग आपण लॉस एंजलिस (२०२८) ऑलिम्पिक-बद्दल स्वप्न पाहायला सुरुवात करू शकतो. बहुधा विश्वचषकात जे काही चुकले, ते सर्व लपवण्यासाठी एवढे पुरेसे आहे,'' असा उपरोधिक टोलाही श्रीजेशने लगावला.

महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक शोर्ड मरीन यांच्यावरही त्याने निशाणा साधला. विश्वचषक शिबीर सुरू असताना मरीन सुट्टीवर गेल्याच्या वृत्ताचा हवाला देत श्रीजेश म्हणाला, ''महिलांचे मुख्य प्रशिक्षक विश्वचषकापूर्वीच सुट्टीवर गेले होते. तरीही खेळाडूंनी लढा दिला आणि अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली. याचे श्रेय खेळाडूंनाच जाते. पण जबाबदारीचे काय? तयारीच्या अंतिम टप्प्यात मुख्य प्रशिक्षकच अनुपस्थित असताना संघाने सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी आपण खरोखर अपेक्षा करू शकतो का?'' असेही श्रीजेश म्हणाला.

संक्षिप्त

प्रदर्शनीय सामन्यासाठी फेडरर कोर्टवर

न्यूयॉर्क : व्यावसायिक टेनिसमधून निवृत्त झालेला २० वेळचा ग्रँडस्लॅम विजेता रॉजर फेडरर अमेरिकन खुल्या स्पर्धेपूर्वी प्रदर्शनीय लढतीसाठी प्रतिष्ठेच्या 'आर्थर ॲश'च्या सेंटर कोर्टवर उतरणार आहे. फेडरर अमेरिकेचा माजी टेनिसपटू अँडी रॉडीकविरुद्ध एकेरीचा एक सेट खेळणार आहे. त्यानंतर जॉन मॅकेन्रो यांच्या साथीत तो रॉडीक आणि आंद्रे आगासी यांच्याविरुद्ध दुहेरीत खेळेल.

फुटबॉल स्पर्धेत पुणे उपांत्य फेरीत

पुणे : वेस्टर्न इंडिया फुटबॉल महासंघ आयोजित महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा वरिष्ठ महिला फुटबॉल स्पर्धेत गतविजेत्या पुणे जिल्हा संघाने कोल्हापूरचा ५-० असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. ही स्पर्धा जळगाव येथे सुरू आहे. पुणे संघाकडून रितीका सिंग हिने तीन, तर दिव्या बसनतानीने गोल केला. अन्य एक गोल स्वयंगोल ठरला. दुसऱ्या सामन्यात ठाणे संघाने यवतमाळ संघाचा ५-० अशाच फरकाने पराभव केला.

उपेंद्र मुळे, मनीष रावत विजेते

पुणे : महाराष्ट्र राज्य मानांकन मास्टर्स टेबल टेनिस स्पर्धेत ५० वर्षांवरील गटात पुण्याच्या उपेंद्र मुळे यांनी सोलापूरच्या अनंत कुलकर्णी यांचा ९-११, ११-८, १४-१२, ११-५ असा पराभव करून विजेतेपद मिळवले. सोलापूरच्या मनीष रावत यांनी पुण्याच्या विवेक फडणीस यांचा ५५ वर्षांवरील लढतीत ८-११, ११-३, ११-३, ११-२ असा पराभव केला. महिला गटात मुनमुन मुखर्जी (५० वर्षांवरील) आणि शिल्पा जोशी (५५ वर्षांवरील) यांनी विजेतेपद मिळवले. स्पर्धेतील ४० वर्षांवरील सांघिक गटात योद्धाज 'अ' संघाने आपल्याच 'ब' संघाचा ३-१ असा पराभव करून बाजी मारली.

भारताच्या अर्जुन रेड्डीची सनसनाटी सुरुवात

बॅडमिंटन स्पर्धेत जगशेरचाही विजय

पुणे : पुणे जिल्हा शहर बॅडमिंटन संघटनेच्या वतीने आयोजित सुशांत चिपलकट्टी स्मृती पुणे महापौर चषक कुमार आंतरराष्ट्रीय ग्रांप्री बॅडमिंटन स्पर्धेत पहिल्याच दिवशी भारताच्या अर्जुन रेड्डी अलुगुवेल्ली याने मानांकित खेळाडूवर विजय मिळवून सनसनाटी सुरुवात केली.

मॉडर्न क्रीडा संकुलात मंगळवारपासून या स्पर्धेला सुरुवात झाली. पहिल्या फेरीत मुलांच्या गटात अर्जुनने संयुक्त अरब अमिरातीच्या आठव्या मानांकित आदित्य किरण याचा २१-१८, १९-२१ २१-१९ असा पराभव केला. अन्य लढतीत दुसऱ्या मानांकित जगशेर सिंग खंगुरा याने नीरज नायर पी. एस. याचे आव्हान २०-२२, २१-८, २१-१५ असे मोडून काढले. वैभव सिंगने वर्णन महंता याचा २१-१०, २०-२२, २१-१९ असा पराभव केला. भारताच्या कार्तिक रुपा सुहास आणि नवव्या मानांकित अश्विन लेनिन मुथुराज यांनीही विजयी सलामी दिली.

जगशेर सिंग

मुलींच्या गटात अक्षिता मनरल हिने शरयू सूर्यानेनी हिचे आव्हान २१-१३, २१-१७ असे मोडून काढले. केतकी थिटेने यवर्णा रेणुश्री श्यामलाराव हिला २१-१०, २१-१४, श्रावणी बिराजदारने लिओनी तायेजाम हिचा २१-१२, २१-१७ असा पराभव केला.

वगळलेल्या पाच खेळाडूंची शिफारसच नव्हती!

टेनिस संघनिवडीवर 'साइ'चे स्पष्टीकरण

पीटीआय, नवी दिल्ली

आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी राष्ट्रीय टेनिस संघातून वगळण्यात आलेल्या पाच खेळाडूंची नावे भारतीय टेनिस संघटनेने (एआयटीए) पाठवलेल्या यादीतच नव्हती, असे स्पष्टीकरण भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साइ) एका अधिकाऱ्याने दिले.

मानस धामणे (पुरुष एकेरी), वैष्णवी आडकर (महिला एकेरी), सहजा यमलापल्ली (महिला एकेरी), वैदेही चौधरी (महिला दुहेरी) आणि प्रार्थना ठोंबरे (महिला दुहेरी) यांची आंतरराष्ट्रीय क्रमवारी विहित निकषांपेक्षा कमी असल्याने त्यांचा संघात समावेश करण्यात आला नसल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले. निर्धारित निकषांनुसार यापैकी एकही खेळाडू आशियाई क्रमवारीत पहिल्या आठमध्ये नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) क्रीडा मंत्रालयाकडे सादर केलेल्या अंतिम यादीतही या पाच खेळाडूंची नावे नव्हती. विशेष म्हणजे, टेनिस संघटनेने 'आयओए'कडे पाठवलेल्या मुख्य यादीतही त्यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. त्यांच्या अलीकडील कामगिरीत पदक जिंकण्याची क्षमता दिसून आली नव्हती असे या अधिकाऱ्याने सांगितले.

आरोपांचे खंडन...

'साइ'चा आरोप भारतीय टेनिस महासंघाने फेटाळला आहे. महासंघाने भारतीय ऑलिम्पिक संघटनेला (आयओए) आपल्या भूमिकेबाबत अधिकृतपणे कळवले होते आणि निवड समितीने निवडलेल्या सर्व खेळाडूंचा भारतीय संघात समावेश करण्याची मागणी केली होती, असे सचिव सुंदर अय्यर यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

पश्चिम विभागाच्या आशा कायम

बंगळूरु : मुशीर खान (९६) आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड (६६) यांच्या उपयुक्त खेळीनंतरही निर्णायक क्षणी झटपट चार फलंदाज गमावल्यामुळे पश्चिम विभागाचा संघ दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीत उत्तर विभागाविरुद्ध अडचणीत आला आहे. विजयासाठी २८७ धावांचा पाठलाग करताना तिसऱ्या दिवसअखेर पश्चिम विभागाची ७ बाद २२० अशी स्थिती झाली असून, त्यांना आणखी ६७ धावांची गरज आहे. मात्र, मुंबईसाठी अनेकदा संकटमोचक ठरलेले तनुष कोटियन आणि शार्दूल ठाकूर अद्याप शिल्लक असल्याने पश्चिम विभागाच्या आशा कायम आहेत.

महाराष्ट्र ग्रामीण बँक
MAHARASHTRA GRAMIN BANK
शासकीय मालकीची शेड्युल्ड बँक Scheduled Bank Owned by Government

ई-लिलाव व विक्री सूचना

मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. ४२, गट क्र. ३३,(भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर -IV, सिडको, छ. संभाजीनगर .-४३११३६.
क्षेत्रीय कार्यालय : पुणे

सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा - २००२ तहत ई-ऑक्शन द्वारे (ऑनलाईन विक्री) विक्रीची जाहीर सूचना तथा, कर्जदार / जामीनदारास सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ (यापुढे नियम असे संबोधन्यात येईल) सह वाचण्यात येणारा सरफेसी कायदा २००२ (यापुढे कायदा असे संबोधण्यात येईल) तहत ई-ऑक्शन द्वारे विक्री

खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचा सेक्युरीटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तहत प्रदान अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी आणि खालील कर्जदार / तारणकर्ता यांचे संरक्षित मालमत्तेच्या घेतलेल्या ताब्याला अनुसरून व सर्व जनतेस व संबधीत कर्जदार / तारणकर्ता व जर त्यांचे कायदेशीर वारसदार असतील तर त्यांचेसह सर्व संबधीतास कळविण्यात येते की, खाली नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामुळे, बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी उपरोक्त कायद्याचे नियम ८ व ९ नुसार खालील मालमत्ता **'जशी आहे जेथे आहे तशी'** व **'जी काय आहे तशी'** या तत्वावर ऑनलाईन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक हे संरक्षित ऋणको आहेत, त्यामुळे कर्जदाराचे /भागीदाराचे इतर कोणत्याही ऋणकोचे प्रलंबित वाद हे लिलावाद्वारे खरेदी केलेल्या मिळकतीमध्ये तसेच खरेदीदाराचे हक्क यास प्रभावित करू शकणार नाहीत. तसेच विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेवर कोणत्याही कोर्टाची स्थगिती (Stay) नाही.

मिळकत लॉट क्र.	कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव व पत्ता, शाखेचे नाव व कर्ज खाते क्र.	मालमत्तेचा तपशील (चतु:सीमेसहीत)	विक्री केली जात असलेल्या मालमत्तेची थकीत रक्कम	आरक्षित किंमत रुपये इसार जमा राशी रुपये बोली रक्कमेतील किमान वाढ रुपये	प्रत्यक्ष ताबा दिनांक
१	**कर्जदार - १. श्री राहुल शांतीलाल बेदमुथा २. श्रीमती अन्नपूर्णा राहुल बेदमुथा,** पत्ता : फ्लॅट क्र.२०६, दुसरा मजला, बिल्डिंग क्र. बी ४, सारा सिटी पोस्ट खरबवाडी, ता. खेड, पुणे - ४१०५०१ **शाखा- मेदनकरवाडी गृह कर्ज खाते क्र. ८००३१६४८४४९**	फ्लॅट क्र. बी २०६, एरिया १००० चौ फु. बिल्ट अप, दुसरा मजला, बिल्डिंग क्र बी-४,गट क्र.१८७/१,१८७/२,१८९, ४५५, ४५६, ४६०, ४५९,१८८, ४५८, ४५४ पोस्ट खरबवाडी, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१ चतु:सिमा- पूर्व : गट क्र. १५७, पश्चिम :३० मिटर रस्ता उत्तर : कंपाऊंड भिंत, दक्षिण : MIDC सीमा	२९,२५,६१३/- आणि दिनांक ०१/०८/२०१८ पासून प्रलंबित व्याज व इतर खर्च	**रु. १९५६६००/- रु.१९५६६०/- रु.१००००/-**	१५.१२.२०२०
२	**कर्जदार-१ सचीन बंडूजी जमधाडे २. कविता सचीन जमधाडे** पत्ता: स.नं ३८/४ प्रकाश पठारे वस्ती, दत्त मंदिरजवळ, खराडी, पुणे४११०१४ **शाखा- शिरसवाडी कर्जखाते- ८००७५३७३९७८**	गट क्र. ५३, वाडेबोलहाई, ता. हवेली, जि. पुणे येथील साई सहवास इमारती/प्रकल्पामधील निवासी फ्लॅट क्र. सी-४०४, सी विंग, चौथा मजला, क्षेत्रफळ ३७१ चौ. फूट म्हणजेच ३४.४० चौ. मीटर आणि संलग्न टेरेस क्षेत्रफळ ३.७६ चौ. मीटर, बाल्कनी क्षेत्रफळ ३.५४ चौ. मीटर, चतु:सीमा: उत्तरेकडे किंवा उत्तरेला - डक्ट, पूर्व - फ्लॅट क्र. ४०१, दक्षिण- फ्लॅट क्र. ४०३, पश्चिम - मोकळी जागा	दिनांक ०२/०२/२०२४ वरील रु.२०३७९४६/- आणि दिनांक ०१/०१/२०२४ पासून प्रलंबित व्याज व इतर खर्च	**रु.१८६१२००/- रु.१८६१२०/- रु.१००००/-**	०३.०६.२०२४

केवायसी व अनामत रक्कम जमा करण्याचा दिनांक व वेळ : २९/०९/२०२६ ; सायंकाळी ५:०० पर्यंत
मालमत्ता निरीक्षणाचा दिनांक व वेळ : २८/०९/२०२६; सायंकाळी: ५:०० पर्यंत
लिलावाचा दिनांक व वेळ (५ मिनिटांच्या वाढीव वेळेनुसार, जर शेवटच्या ५ मिनिटांत बोली लावली असेल तर) :३०/०९/२०२६ : सकाळी ११:०० ते दुपारी १:३० पर्यंत

अटी व शर्ती -

१) लिलाव ऑनलाइन पद्धतीने website https://baanknet.com या संकेतस्थळावर निश्चित केलेल्या दिवशी होईल. शेवटच्या ५ मिनिटांत बोली आल्यास लिलाव आपोआप ५ मिनिटांनी वाढवला जाईल.
२) बोलीदारांनी https://baanknet.com या वेबसाईटवर नोंदणी करावी लागेल आणि अनामत रक्कम (Earnest Money Deposit) लिलावा आधी भरावी लागेल. ही रक्कम बँकेकडे जमा होऊन वेबसाईटवर अपडेट होईपर्यंत थोडा वेळ लागू शकतो. म्हणून लिलावाच्या कमीत कमी २४ तास आधी अनामत रक्कम भरावी.
३) सविस्तर अटी व शर्तींसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वेबसाईटवर व https://baanknet.com या वेबसाईटवर दिलेल्या लिंक्स बघाव्यात. तसेच पुढील अधिकार्यांशी संपर्क साधावा: १) श्री. महेश ससाणे , अधिकृत अधिकारी/ क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, पुणे . मोबाइल क्र. ९४२३७५३४०० , ईमेल: rmpune@mahagramin.co.in २) मेघा रूईकर, शाखा व्यवस्थापक, मेडंकवाडी, शाखा, मोबाईल : ९९६०८४७९३६, ३) श्री. उदय जाधव, मोबाइल क्रं. ९८२०८७८२५५ ईमेल: uday.jadhav@psballiance.com ५) हेल्पलाइन क्रं. ८२९१२२०२२० आणि ईमेल: support.baanknet@psballiance.com.
४) यशस्वी बोलीदारास खरेदी रक्कमेपैकी २५% (अनामत रक्कम सहित) रक्कम लगेच जमा करावी लागेल आणि उरलेली रक्कम १५ दिवसांच्याआत भरावी लागेल.
५) बोली आरक्षित किमतीपेक्षा जास्त असावी आणि पुढील बोली किमान १०,००० च्या पटीत वाढवावी लागेल.
६) ज्या बोलीदारांची बोली यशस्वी ठरलेली नाही, अशा बोलीदारांचा अनामत ठेव रक्कम लिलाव प्रक्रिया संपल्या नंतर परत केली जाईल.
७) लिलाव बँकेच्या मंजुरीवर अवलंबून आहे. कर्जदाराने बँकेकडे पूर्ण थकबाकी भरल्यास लिलाव रद्द केला जाऊ शकतो.
८) मालमत्ता जशी आहे तशी आणि जे आहे ते या तत्वावर विकली आहे. बोलीदारांनी मालमत्तेबाबत स्वत: चौकशी करावी, त्यावरील कोणतेही दावा/ खर्च बँकेशिवाय असतील तर त्यास बँक जबाबदार नाही.
९) बँकेला कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार आहे. ती लिलाव रद्द/स्थगित/परिवर्तीत करू शकते.
१०) खरेदीदाराने सर्व शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, कर आणि ईतर खर्च स्वत: भरावेत. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावावरच दिले जाईल.
११) मालमत्तेची पाहणी इच्छुकांनी स्वत:च्या खर्चाने करू शकतात, पण यासाठी वरील संपर्क व्यक्तींशी पूर्व नियोजित वेळ घेऊन भेट द्यावी.
१२) लिलाव सरफेसी कायदा २००२ अंतर्गत होणार आहे, व वरील अटींचे पालन बंधनकारक आहे.

दिनांक : २६.०८.२०२६
ठिकाण : पुणे

स्वैर भाषांतर : तफावत आढळल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.

प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय, पुणे

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३१९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहिल्यानगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर* (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुन:प्रकाशनास वा पुन:प्रसारणास मनाई.